JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# लोकसाहित्याभ्यासाचे स्वरूप आणि आवश्यकता

# Loksahityabhyasache Swaroop Ani Avashyakata

अनिल गोवर्धन पवळ
संशोधकविद्यार्थी,
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
महाराष्ट्र – ४११००७.

## प्रस्तावना

उत्क्रांतीपासून आजतागायत मानवी समूहाने अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. या समाजिक स्थित्यंतराचा पडसाद आपल्याला सहाजिकच मानवी समूहाने विकसित केलेल्या संस्कृतीमध्ये पहायाला मिळतात. या लोकसंस्कृतीतील रूढी, परंपरा, चालीरिती यांचा अभ्यास केला तर आपल्याला गतकाळातील मानवी समूहातील घटितांचे पुरावे आणि परिणाम यांचा प्रत्यय येतो. यामध्ये मानवाने आपले जीवन रंजक आणि सुखकर बनविण्यासाठी वेगवेगळ्या कलांची निर्मिती केल्याचे प्रकर्षाने जाणवते. चित्रकला, शिल्पकला, गुहाचित्रे, संगीतवाद्ये, गाणी, कथा अशा विविध कलांची निर्मिती करून मानवी जीवन सुखावह केले गेले. या कलांची निर्मिती समान्य लोकांनीच आपल्या अनुभवांच्या आधारे मनोरंजन, विरेचन अथवा ज्ञान अशा उद्देश्यांनी केली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात हे संचित सुपूर्द केले जात असे. मौखिक परंपरेने पूर्वापार चालत आलेल्या याच कला-साहित्याला सोप्या भाषेत 'लोकसाहित्य' म्हणता येईल. भाषा आणि सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करताना लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

## लोकसाहित्य म्हणजे काय ?

मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'Folk Lore' या शब्दासाठी वापरला जातो. 'Folk''साठी 'लोक' तर 'Lore' साठी 'साहित्य' हे पद वापरले जाते. १८४६ साली विल्यम जॉन थॉमस यांनी प्रथम Folk Lore ही संज्ञा वापरली. Folk Lore ही व्यापक संकल्पना आहे. त्यात लोककथा, लोकगीते, लोकनाट्ये यांसारखी वाङ्मयीन रूपाजवळ जाणारी आविष्काररूपे, म्हणी, वाक्प्रयोग, प्रहेलिका ही भाषिक अभिव्यक्तीची रूपे, तसेच विधिविशेष श्रद्धा, समजुती, रुढी, सण-समारंभ, उत्सव, कर्म- कौशल्ये यांचा समावेश Folk Lore या संज्ञेत होतो. त्यामुळे मराठीत या संज्ञेविषयी एकमत नाही. लोकविद्या, लोकायन, लोकवार्ता, लोकवाङ्मय अशा काही संज्ञा या शब्दासाठी सुचविल्या गेल्या आहेत. दत्तो वामन पोतदार यांनी 'लोकविद्या' ही संज्ञा सुचविली. त्यापूर्वी वि. का. राजवाडे यांनी 'लोकसाहित्य' ही संज्ञा सुचविली तर, प्रभाकर मांडे

यांनी प्रथम 'लोकवाङ्मय' आणि नंतर 'लोकसाहित्य' हीच संज्ञा वापरली. हळूहळू मराठीत Folk Lore साठी 'लोकसाहित्य' ही संज्ञा रूढ झाली. ''पारंपरिक लोकजीवनपद्धती म्हणजे लोकसाहित्य किंवा लोकमानसातील कृती उक्तींचा अविष्कार म्हणजे लोकसाहित्य.''[१] ही शरद व्यवहारे यांनी केलेली व्याख्या विचारात घेतली तर आपल्या असे लक्षात येईल की मानवी समूहाने आपल्या रोजच्या जगण्यातून, अनुभवांमधून लोकसाहित्याची निर्मिती केली आहे.

## लोकसाहित्यातील 'लोक'

'लोकसाहित्य' या संज्ञेतील 'लोक' ह्या संकल्पनेवरदेखील विविध अंगांनी चर्चा झाल्याचे आपल्याला पहायाला मिळते. लोक या शब्दाचा अर्थ 'वाहणारा' किंवा 'वाहण्याचे काम करणारा जनसमुदाय' असा होतो. ऋग्वेदात 'लोक' हा शब्द 'जनसामान्य' या अर्थानि आला आहे. ना. गो. कालेलकर यांच्या मते, 'लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग.' प्रभाकर मांडे यांनी 'लोक'विषयी मांडलेली भूमिका पाहणे देखील आवश्यक आहे. ते म्हणतात, ''लोक म्हणजे असा समाज जो सुसंस्कृत किंवा नागर समाजापासून दूर असतो. त्यांच्यापेक्षा निराळे आणि परंपरेने चालत आलेले जीवन जगतो. पारंपरिकता हा या समाजजीवनाचा एक महत्त्वाचा विशेष असतो. हा समाज एकसंघ असून सुसंस्कृत समाजामध्येच परंतु निराळे जीवन जगतो.''[२] यावरून 'लोक'च लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचे वाहक आहेत. तारा भवाळकर यांचे मतदेखील वरील दाव्याला पुष्टी देणाराच ठरतो. त्यांच्या मते, ''जे खेड्यात किंवा शहरात राहतात, ज्यांना स्वत:च्या सांस्कृतिक परंपरेचे भान असते. जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात. ही परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. त्यांचे जीवन नैसर्गिक, सहज आणि स्वाभाविक असते.''[३]

## लोकसाहित्याभ्यासाची आवश्यकता

मानवी समूहाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. एवढ्या प्रदिर्घ कालावधीमधील मानवी इतिहासाच्या पाऊलखुणा शोधण्यासाठ लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कालपटलावरील घटितांच्या खूणा तत्कालीन मौखिक परंपरेतील साहित्यामध्ये आढळून येतात. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकमानस, लोकयान तसेच फोकलिटरेचर अशा वेगवेगळ्या संज्ञा एकूणच प्राचीन काळापासून कार्यरत असलेल्या मानवी परंपरागत समाजजीवनाशी, मानवाच्या इतिहास संस्कृतीकडेच आपणाला घेऊन जाणाऱ्या आहेत. म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, "एखाद्या देशातील लोकजीवनाचे वास्तविक रूप समजून घ्यावयाचे असेल तर लोकसाहित्यासारखे दुसरे खात्रीशीर साधन आढळणार नाही. कारण लोकसाहित्यामध्ये नैसर्गिकपणे कोणताही आडपडदा न ठेवता मानवी मनाचा आविष्कार झालेला असल्याचे भावनात्मक पातळीवरती जरी हा आविष्कार झालेला असला तरी त्यात प्रकट होणारे वास्तव खोटे असत नाही. म्हणून समाजजीवन समजून घेण्यासाठी लोकसाहित्य उपयुक्त ठरते.'' [४]

मराठी लोकसाहित्य हा एकंदर मराठी साहित्याचा एक महत्त्वपूर्ण विभाग आहे. मराठी लोकसाहित्याच्या संकलनाचे काम आपल्याला अभिमान वाटावे इतके समाधानकारकपणे चालले आहे. परंतु लोकसाहित्याचा अभ्यास साहित्यिक अंगाने जितक्या प्रमाणात व्हायला पाहिजे तसा तो होताना दिसत नाही, असे मला म्हणावेसे वाटते. याला सन्माननीय पहिला अपवाद म्हणजे डॉ. सरोजिनी बाबर यांचा. डॉ. ना. गो. नांदापूरकरांनी केलेले विवेचनही महत्त्वाचे आहे. अलीकडे कवी ना.

धों. महानोरांनी पळसखेडची गाणी प्रसिद्ध केली. या संग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबरांच्या सारखीच रसज्ञतेने आस्वादक समीक्षा लिहिली. मात्र आस्वादक समीक्षा हे समीक्षेचे एक अंग आहे. समीक्षेची अन्य क्षेत्रे लोकसाहित्याच्या संदर्भात अजूनही अलक्षितच राहिलेली दिसतात. तेव्हा लोकसाहित्याची समीक्षा त्यातील साहित्यगुणांचा विचार करण्यासाठी अनेक अंगांनी होणे, एकंदर मराठी साहित्याच्या संदर्भात होणे नितांत गरजेचे आहे, असे डॉ. गो. मा. पवार यांनी नोंदविलेला निष्कर्ष लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी दिशादर्शक आहे. [५]

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून लोकसाहित्याच्या संकलनाचे फार मोठे व महत्त्वाचे कार्य लोकसाहित्याच्या संशोधकांनी आतापर्यंत करून अभ्यासासाठी ते उपलब्ध करून ठेवले आहे हे स्पष्ट झाले आहेच. लोकसाहित्याचा संस्कृतीच्या अंगाने व समाजशास्त्रीय भूमिकेतून आतापर्यंत काही अभ्यास झालेला आहे. हा अभ्यास निश्चितच महत्त्वाचा आहे. या अभ्यासाच्या जोडीनेच वाङ्मयीन भूमिकेतून लोकसाहित्याचा अभ्यास होणे हे अत्यंत गरजेचे आहे. लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या व्यासंगी विद्वानांनाही समाजशास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळत नसल्याची तक्रार पाश्चात्य अभ्यासकांनी नमूद करून ठेवली आहे. आपल्याकडेही परिस्थिती याहून वेगळी नाही. मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाने उपेक्षित राहिलेले हे जे अंग आहे. त्याकडे लक्ष पुरवणे फार गरजेचे आणि महत्त्वाचे आहे. अशा वाङ्मयीन भूमिकेतून लोकसाहित्याच्या विविध अंगांचा जर विचार, व्यासंग आणि विवेचन होत राहिले तर लोकसाहित्याच्या अभ्यासाला एक महत्त्वाचे परिमाण प्राप्त होईल, अशी आशा वाटते.

**संदर्भ आणि टिपा :**


१. 'लोकसाहित्य : संकल्पना व स्वरूप', डॉ. शरद व्यवहारे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी १९९९, पृ. १५.

२. 'लोकसाहित्याचे स्वरूप', डॉ. प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९७८, पृ. ८.

३. 'लोकसाहित्य,' डॉ. तारा भवाळकर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुस्तिका

४. 'लोकसाहित्यमीमांसा' (भाग दुसरा), डॉ. विश्वनाथ शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २००६, पृ. ४५, ४६.

५. 'वेध लोकसाहित्याचा', अंतर्भूत लेख : लोकसाहित्याचा अभ्यास, लेखक : गो. मा. पवार, संपा. डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. महालक्ष्मी मोराळे, सायन पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, प्रथमावृत्ती, ५ नोव्हेंबर २०१८, पृ. १०१.